महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग

**कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य,**

सर ज.जी.कला शाळा आवार, डॉ.दा.नौ.मार्ग,मुंबई. ४०० ००१. दुरध्वनी क्र.२२६२०२३१/३२

Website:-www.doa.maharashtra.gov.in Email:-dirdoa.mum-mah@gov.in/directorateofart@gmail.com

दिनांक:- ४ ऑगस्ट, २०२३

## प्रसिध्दीपत्रक

**शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करीता प्रथम वर्ष प्रमाणपत्र / पदविका अभ्यासक्रम रिक्त जागांसाठी प्रवेश प्रक्रिया**

------

दिनांक २७ जुलै, २०२३ रोजीच्या प्रसिध्दीपत्रकात नमुद केल्यानुसार ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेतील विद्यार्थ्यांचे प्रवेश झाल्यानंतरही जागा रिक्त राहिल्यास सदर जागांसाठी प्रवेश घेण्याकरीता विद्यार्थ्यांनी मुळ कागदपत्रांसह संबंधित कला संस्थेवर दिनांक ७ ऑगस्ट, २०२३ ते १८ ऑगस्ट, २०२३ या कालावधित उपस्थित राहावे. संबंधित संस्थांची रिक्त जागांची माहिती http://doaonline.co.in/fineart२३ या लिंकवर उपलब्ध करुन देण्यात येईल.

ज्या विद्यार्थ्यांनी शैक्षणिक वर्ष २०२३-२४ च्या प्रवेश प्रक्रियेकरीता ऑनलाईन रजिस्ट्रेशन केलेले नाही अशा विद्यार्थ्यांनी http://doaonline.co.in/fineart२३ या लिंकवर जाऊन ऑनलाईन रजिस्ट्रेशन करावे. तसेच रजिस्ट्रेशन केलेल्या आवेदन पत्राची प्रत व मुळ कागदपत्रांसह संबंधित संस्थेवर प्रवेशासाठी वरील कालावधीत उपस्थित राहावे. विद्यार्थ्यांनी संबंधित संस्थांकडून दिलेल्या सूचनांचे /आदेशांचे पालन करावे.

संबंधित संस्थांना सुचित करण्यात येते की, संचालनालयाच्या स्तरावरुन ऑनलाईन स्वरुपात झालेली प्रवेश प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतरही प्रवेशाच्या जागा रिक्त असल्यास, **दिनांक ९ जून, २०२३ ते १० जुलै, २०२३ या तसेच आता दिनांक ७ ऑगस्ट, २०२३ ते १८ ऑगस्ट, २०२३ या कालावधित ऑनलाईन अर्ज सादर केलेल्या विद्यार्थ्यांचीच** रिक्त जागांवर शासनाने विहित केलेल्या कार्यपध्दतीचा अवलंब करुन गुणवत्तेनुसार सदर विद्यार्थ्यांची मुळ कागदपत्र तपासून प्रवेश देण्यात यावा. याबाबत संबंधित संस्थांकडून ऑनलाईन करावयाच्या नोंदणीबाबत सविस्तर माहितीपत्रक वरील लिंकवर प्रसिध्द करण्यात येईल.

| | | |
|---|---|---|
| सही/- | - | सही/- |
| ( संदीप डोंगरे ) | | ( राजीव मिश्रा ) |
| प्र.निरीक्षक, | | कला संचालक, |
| चित्रकला व शिल्प, महाराष्ट्र राज्य, मुंबई | | कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई |